# कुलाबा-सीप्झ मेट्रो मार्गाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

मुंबई : मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज ६ अंतर्गत सहार रोड स्थानकाची पाहणी आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी करून समाधान व्यक्त केले. या वेळी त्यांनी काही सूचनाही केल्या. मुख्यमंत्र्यांनी कॉर्पोरेशनच्या अधिकारी व अभियंत्यांकडून सध्या सुरू असलेल्या मेट्रो-३ च्या कामाचा आढावा घेतला व त्यावर समाधान व्यक्त केले. त्यांनी मेट्रोसाठी खोदलेल्या मोठ्या बोगद्यात फिरून कामाची पाहणीही केली. सहार रोड स्थानकाचे भुयारीकरण ४८ टक्के पूर्ण झाले असून पॅकेज- ६ चे एकूण काम ५९ टक्के पूर्ण झाले आहे. सहार रोड स्थानकाची लांबी २१८ मीटर असून रुंदी ३० मीटर आहे. पॅकेज-६ चे एकूण ५९ टक्के काम; तर ७३ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.